श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचलीत,

# पंडीत जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर, जि.जळगाव

Recognised U/S 2 (f)

**NAAC प्रमाणित B ग्रेड**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,संलग्नीत आणि सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त**

Shram Safalya Education Society's
P.J.N.College of Social Work, Amalner
Professional Social Work for Better Society

# संस्थाभेटी अहवाल
# वर्ष - 2023-24

Co-Ordinator
IQAC
P.J.N College of Social Work
Amalner,Dist. Jalgaon

IQAC

Principal
Pt.Jawaharlal Nehru College
of Social Work,Amalner

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचलित

# पंडीत जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर जि.जळगांव

## ORIENTATION VISIT

| अ.क्र. | दिनांक | संस्था भेटी | सहभागी विद्यार्थी संख्या BSW / MSW | सहभागी शिक्षक |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/09/2023 | चावरा स्कुल व आश्रम, अमळनेर | 70 | प्रा. डी. आर. ढगे<br>प्रा.डॉ. अस्मिता सरवैया |
| 2 | 06/09/2023 | गुजरात महिला हाऊसिंग ट्रस्ट सोसायटी, अमळनेर | 65 | प्रा. डॉ. सोनवणे जे. एस.<br>प्रा.डॉ. अस्मिता सरवैया |
| 3 | 06/09/2023 | ममता मतिमंद विद्यालय, अमळनेर | 70 | प्रा. ढगे डी. आर.<br>प्रा. डॉ. सोनवणे जे.एस.<br>प्रा. व्हि. बी. वाघमारे |
| 4 | 06/09/2023 | जन साहस संस्था, अमळनेर | 75 | प्रा. वाघमारे व्ही. बी.<br>प्रा. ढगे डी. आर. |
| 5 | 06/09/2023 | राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्था, अमळनेर | 60 | प्रा. डॉ. जे.एस.सोनवणे<br>प्रा. व्हि.बी.वाघमारे |
| 6 | 07/09/023 | आधार बहुउद्देशिय संस्था, अमळनेर | 70 | प्रा.डॉ.जे.एस.सोनवणे<br>प्रा.डॉ.एस.आर.चव्हाण |
| 7 | 07/09/2023 | स्वाधार संस्था, अमळनेर | 75 | प्रा.डॉ.जे.एस.सोनवणे<br>प्रा.डॉ.एस.आर.चव्हाण<br>प्रा.डॉ.एस.व्हि.वैद्य |
| 8 | 07/09/2023 | ग्रामिण रुग्णालय महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, एकात्मिक समुपदेशन केंद्र, आय.सी.टी.सी., अमळनेर | 60 | प्रा.डॉ.जे.एस.सोनवणे<br>प्रा.डॉ.एस.आर.चव्हाण<br>प्रा.डॉ.एस.व्हि.वैद्य |
| 9 | 19/10/2023 | लिलाई बाल गृह | 70 | प्रा.डॉ.भरत खंडागळे<br>प्रा. व्हि.बी.वाघमारे<br>प्रा.डॉ. अस्मिता सरवैया |
| 10 | 19/10/2023 | चेतन व्यसनमुक्ती केंद्र, जळगांव | 70 | प्रा.डॉ.भरत खंडागळे<br>प्रा. व्हि.बी.वाघमारे<br>प्रा.डॉ. अस्मिता सरवैया |
| 11 | 19/10/2023 | आश्रम माझे घर | 70 | प्रा.डॉ.भरत खंडागळे<br>प्रा. व्हि.बी.वाघमारे<br>प्रा.डॉ. अस्मिता सरवैया |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | 19/10/2023 | केशवस्मृती प्रतिष्ठान वृघ्दांश्रम | 70 | प्रा.डॉ.भरत खंडागळे<br>प्रा. व्हि.बी.वाघमारे<br>प्रा.डॉ. अस्मिता सरवैया |
| 13 | 19/10/2023 | बालगृह व निरीक्षण गृह | 70 | प्रा.डॉ.भरत खंडागळे<br>प्रा. व्हि.बी.वाघमारे<br>प्रा.डॉ. अस्मिता सरवैया |

VISIT - 1

दि. 01/09/2023

**प्रस्तावना** :-

पंडीत जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर विद्यालयातील विद्यार्थी असुन आम्हाला संस्थेची भेट करणे व संस्थेचे काम जाणुन घेण्यासाठी मार्गदर्शक प्रा.डी.आर.ढगे सर यांच्या नेतृत्वात चावरा आश्रम, देवळी येथे माहिती जाणुन घेण्यासाठी आलो. तर आम्ही संस्थेची माहिती खालील प्रमाणे जाणुन घेतली आहे.

**संस्थेचे नाव** :- चावरा आश्रम, देवळी ता. अमळनेर

**संस्थेचा पत्ता** :- चोपडा रोड, चावरा आश्रम, देवळी ता. अमळनेर

**संस्थेची नोंदणी** :- काही कारणास्तव मिळाली नाही

**संस्था शासकीय/निमशासकीय** :- सदर चावरा आश्रमातील कार्यप्रक्रिया निमशासकीय आहे

**संस्थेचे कार्यकारी मंडळ** :- चावरा आश्रमात आम्ही विचारणा केली असता तेथील कार्यकारी मंडळ संचालक हे फादर जोफेस आहेत व इतर उपध्यक्ष व इतर सदस्यांनी स्थापन केलेली आहे.

**संस्थेची पार्श्वभुमी** :- चावरा आश्रम हे एक केरळ येथील एक खिश्चन यंत आहेत. हे संत चावरा केरळ मध्ये उदयास आले. त्यांचा वारसा लोकांचे सामाजिक गोरगरीबांचा विकास होण्यासाठी त्यांनी मोठे कार्य केले व ते कार्य सतत त्यांच्या नावाने चालु रहावे त्यासाठी आज जवळ-जवळ या संस्था महाराष्ट्र राज्यात नव्हे तर संपुर्ण भारतात 2000 संस्था हे कार्य करीत आहे.

चावरा आश्रम हि संस्था स्थापन जुन 2006 साली झाली असुन जळगांव, धुळे, चोपडा येथे कार्य चालविले जात आहे. या हि संस्थेची थोडक्यात पार्श्वभुमी आहे.

**संस्थेचा उद्देश** :- संस्थेचा मुख्य उद्देश हा आहे की, आता सुध्दा असा मागासलेला समाज आहे की त्या कुटुंबाला दोन वेळेचा उदरनिर्वाह करणे अडचणी निर्माण होतात अशा परिस्थितीत असलेले गोर गरीब मुलांना समाजाच्या बरोबरीने योग्य ते शिक्षण मिळावे व योजनांचा लाभ मिळावा व त्यांना वसतिगृहात राहण्याची व जेवणाची, शिक्षणाची व सर्वांगिण विकास होण्यासाठी सर्व समस्या लक्ष्यात घेऊन निशुल्क पालनपोषण करणे या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

**संस्थेची प्रशासकीय व्यवस्था :-** या संस्थेचे कामकाज खुप मोठा आहे. हि संस्था जवळपास संपुर्ण भारतात पसरलेली आहे व तिचे काम पण व्यवस्थित पणे चालत आहे. संस्थेचा प्रशासकीय यंत्रणा हि संचालक नुसार चालते.

**लाभार्थी प्रवेश प्रक्रिया / दैनंदीनी :-** संस्थेची प्रवेश प्रक्रिया हि SC,ST,Open लाभार्थी प्रवेश घेवु शकतात इथे कुठल्याही जातीचा, धर्माचा गोरगरीब व्यक्ती साधारण कुटुंबातील मुलांना सहजरित्या प्रवेश घेवु शकतात संस्थेचा शैक्षणिक किंवा दैनंदीन कार्यक्रम हा सकाळी 10.00 ते दुपारी 5.00 या वेळेत चालतो.

**संस्थेचा आर्थिक स्त्रोत :-** संस्थेचा आर्थिक स्त्रोत हा संस्थेला येणा-या इतर निधी हा असा म्हटल्या पेक्षा संस्थेच्या परिसरात घेण्यात येणा-या शेती या उत्पंन्नातुन केला जातो. इतर कुठलेही साधन हि संस्था चालवण्यास निदर्शनास आलेला आहे.

**नोंदणी पध्दत** :- संस्थेत नोंदणी ठेवण्याची पध्दत ही दैनंदीन व रजिस्टर स्वरुपात असुन चावरा आश्रम येथे Online पध्दतीने ठेवली जाते. तसेच हि संपुर्ण माहिती मुख्य Head Office ला Online स्वरुपात पाठवली जाते अशा प्रकारे या संस्थेची नोंदणी पध्दत आहे.

**संस्थेला येणा-या समस्या** :- संस्था चालवत असतांना संस्थेला मिळालेला आपुरा निधी सरकारकडुन मानधन न मिळणे समाजात Donetion माघत असतांना समाजात येणा-या समस्या अश्या अनेक समस्यांना तोंड देवुन संस्था सुरळीत पणे चालत आहे.

**संस्थेची क्षमता** :- संस्थेत एकुण जागेसह जवळपास 70 ते 85 विद्यालयाचा क्षमता या चावरा आश्रम वसतीगृहात आहेत.

**समाजिक कार्यकर्त्याची भुमिका** :- चावरा आश्रम या संस्थेने समाजातील गरीब व गरजु व्यक्ती व शेतकरी गरीबांचे मुल शेतक-यांचे मुल यांना चांगल्या सुविधा व निवासव्यवस्था त्यांना चांगले शिक्षण त्यांचा विकास होण्यास व काही योजनांपासुन वंचित राहिले अश्या मुलांना घडवणे व त्यांचा विकास करणे हि समाजकार्यकर्त्यांची भुमिका आहे.

VISIT - 2

**दि**. **6/09/2023**

**संस्थेचे नाव** - महिला हाऊसिंग ट्रस्ट संस्था, अमळनेर

**मार्गदर्शक** :- आशा पाटील

**संस्थेची पाश्वभुमी** :- गुजरात महिला हाऊसिंग ट्रस्ट या संस्थेची स्थापना 9/11/2017 ला झाली हि संस्था 27 वर्षापासुन अनेक जिल्हात काम करत आहे. जस की जोधपुर, जयपुर, झारखंड, ओडिसा, मध्यपद्रेश, नेपाल, बंगाली अनेक राज्यात या संस्थेचे काम अगदी व्यवस्थीत पणे चालु आहे.

महिला हाऊसिंग ट्रस्ट हि भारतातील तळागाळातील विकास संस्था आहे. ज्याचा विश्वास आहे. की महिला अधिक शाश्वात आणि लिंग समावेशक शहरांच्या दिशेने प्रगती करण्यात अग्रेसर आहेत. आमही महिलांच्या तळागाळातील संस्था विकसित करण्यात आणि त्यांच्या समुदाय आणि शहरांशी सबंधित असलेल्या समस्यांवर निर्णय घेण्यामध्ये सहभागी होण्यासाठी त्यांचे ज्ञान आणि क्षमता निर्माण करण्यात मदत करते.

गरीब समर्थक सेवा आणि कार्यक्रम डिझाइन करण्यात आणि वितरीत करण्यात मदत करण्यासाठी आम्ही बांधकाम, तंत्रज्ञान आणि शहरी प्रशासनातील तांत्रिक कौशल्य देखील आणतो.

सुरवातीला IAP घेतली जाते. 200 PR,m चे म्हणजे याला काही आवश्यकता सर्वप्रथम आम्ही निरीक्षण करतो एक महिना 15 दिवस आधी समजुन घेतो काय-काय येते काय-काय नाही येत त्याच्यानुसार IAP घेतात. त्यानंतर त्यांचे कौशल्ये घेतात की त्या विद्यार्थ्यांवर काय-काय करावे लागेल त्यानंतर त्यांचा अभ्यास चालत असतो.

मतिमंद होणारे वेगवेगळे कारणे असतात जस की नात्यामध्ये किंवा आईला वेगळे व्यसन असत किंवा जेनेटिक समस्या असतात त्यामुळे मतिमंद बाळ जन्माला येत असत.

**संस्थेचे उदिष्टे** :-

1) मतिमंदाना समाजात स्वभिमानाने जगावे.

2) त्यांचे हक्क त्यांना मिळावा.

3) त्यांच्यातले कौशल्ये बघणे.

4) स्व:ताचा व्यवसाय सुरु करावा.

5) प्रत्येकी आनंदाचा सहभाग मिळावा.

6) समाजाच्या वाईट विचारांपासुन वाचवणे.

**संस्थेची दैंनदिन** :- सकाळपासुन तर सायंकाळपर्यंतचे त्यांचे नियोजन असणे त्यांना वेहेवर जेवण प्रार्थना घेणे त्यांचा अभ्यास घेणे, वेगवेगळया वस्तु बनविणे, मुलींना स्वयंपाक कसा बनवतात तांदुळ कसे निवडावे हेच त्यांचे दैंनदिनी असत.

सध्या डॉ. मंगेश वैद्य व डॉ. वैशाली वैद्य हे या संस्थेला सांभाळत आहे. अश्या प्रकारे या संस्थेची पार्श्वभुमी आहे.

**मतिमंद म्हणजे काय** :- मानसशास्त्रीय वर्गिकरण

1. मतिमंद
2. मुखबधिर
3. मंद

**मतिमंद** :- मतिमंद म्हणजे काय सर्वसाधारण बुध्दीपेक्षा कमी बुध्दीमत्ता असलेला इरांशी जुळण न घेणारा अश्या मुलांसोबत आपल्याला सर्वसाधारण पणे संवाद साधता येत नाही. हे केव्हा लक्ष्यात येत 0 ते 18 या वयात कळत याला मतिमंद आहे. मतिमंदाचे मानसशास्त्रीय वर्गीकरण केले जाते. 1. सम्य मतिमंद 2. माईल 3. बॉट्रेल आणि 4. सिरेल्स

अशा मुलांना स्वभीमानाने कसा जगेल हे ज्ञान देत असतात अश्या मुलांना समाजात कस जगता येईल यासाठी हि संस्था प्रयत्न करत आहे.

**मतिमंदाचे प्रकार** :-

1) Downe Simmeral
2) Ocaizime
3) Seriabale Parcy

**प्रवेश प्रक्रिया** :-

1. कागदपत्रे बघणे
2. वय, वर्ष पाहणे
3. निरीक्षण करणे
4. मोफत प्रवेश

**आर्थिक स्त्रोत** :-

1. शासनाकडुन मिळणे
2. समाजातील मोठ्या लोकांकडुन

3. मानधन मिळणे

4. भेटवस्तुंच्या स्वरुपात

5. कोणाच्या स्मरणार्थी देनगी देणे

**लाभार्थी** :-

1. संध्याला या संस्थेत एकुण 45 विद्यार्थी असुन त्यांचा सांभाळ व्यवस्थीत होत आहे.

**नोंदणी ठेवण्याची पध्दती** :-

1. सर्व प्रथम नाव नोंदणी

2. रजीस्टर मध्ये कच्ची नोंदणी

**संध्या येणा-या समस्या** :- समाजकल्याण मंडळाकडुन मानधन मिळत नसणे

**संस्थेचे कार्यक्रम** :- विद्यार्थ्यांचे प्रत्येकी सण, उत्सव साजरा करणे, रक्षाबंधन, होळी, पोळा, दिवाळी, दसरा असे प्रत्येक सण मुलांसोबत साजरा करणे.

**संस्थेची क्षमता** :- हे विद्यार्थी विविध स्पर्धे मध्ये जिंकले आहे. आणि राज्यस्तरावर पण स्पर्धा जिंकुण आले आहे.

**एकुण कार्य** :-

1. समाजात होणा-या अन्याय अत्याचार यांच्यापासुन वंचित ठेवणे

2. समाजात स्वाभिमानाने जगण्याचा हक्क मिळवुन देणे

3. समस्याग्रस्त व्यक्तींच्या समस्या सोडवणे

**विद्यार्थी मत** :- डॉ. कुबेर वैद्य व डॉ. आशा वैद्य यांनी खुप छान विचार केला व स्वत:च्या मुलांचा विचार न करता समाजातील असंख्य मुलांचा विचार केला व संस्था स्थापन केली व आज 45 मुलांना जगण्याचा हक्क व मानसन्मान दिला.

VISIT - 3

**संस्थेचे नाव** :- ममता मतिमंद विद्यालय, अमळनेर

**संस्था नोंदणी क्रमांक** :- F329

**संस्थेचे संस्थापक** :- डॉ. सुरेश वैद्य, डॉ. आशा वैद्य

**संस्थेची पार्श्वभुमी** :- डॉ. सुरेश वैद्य व डॉ. आशा वैद्य हे स्वत: डॉक्टर असुन त्यांची स्वत:ची मुलगी हि मतिमंद होती. तर त्यांनी विचार केला की समाजात अशा अनेक मुल - मुली हे मतिमंद असतील तर त्यांनी हि संस्था स्थापन केली. व ब-याच मुलांना एकत्र करुन त्यांना पण जिवन जगण्याचा अधिकार मिळावा हा विचार करुन त्यांनी 1981 साली या ममता मतिमंद विद्यालयाची स्थापना केली.

सुरुवातीला 5 विद्यार्थ्यांवर हि विद्यालय सुरु केली 5 करता करता 5 चे 30 झाले 30 चे 35 झाले आज 50 विद्यार्थी या संस्थेत आहेत. तसेच डॉ. आशा वैद्य यांना डॉ. बाबासाहेब दलित पुरस्कार मिळाला आहे. प्राध्यापक जोशी मॅडम व  माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी या संस्थेना भेट दिली आहे.

**संस्थेचे उद्देश** :- MHT ने भारतातील 34 पेक्षा जास्त शहरांमधील स्थानीक सरकारांशी भागीदारी केली आहे. ज्यामुळे शहरी कामी उत्पंन्न असलेल्या समुदायांमध्ये जिवनमान सुधारले आहे.

MHT ने महिलांना सक्षम बनवणे व त्यांचे आरोग्य व व्यवसाय कसा करावा व आपल्या उत्पंन्नाचे नियोजन व आपले जिवनमान कसे सुधारले याबद्दल काम केले आहे. व आपण राहतो तिथले हवामान व निवासस्थानांची गुणवत्ता सुधारेल यासाठी आम्ही काम करत आहे.

**संस्थेचा प्रकार** :-

1. पाणी आणि स्वच्छतेसाठी समान प्रदेश
2. हवामान लवचिकता आणि उर्जा कार्यक्षमता निर्माण करणे
3. महिलांचे जमीन व गृहनिर्माण हक्क सुरक्षित करणे
4. निवासस्थान सुधारण्यासाठी मायक्रोलेंडींग
5. प्रशासन आणि नियोजनात सहभाग वाढवणे
6. बांधकाम मध्ये उपजिविका
7. सामुदायिक पायाभुत सुविधा आणि सार्वजनिक जागा सुधारणे
8. आपत्ती प्रतिसाद आणि पुनप्राप्ती

**मुख्यकार्यालय** :- 701,702 सातवा मजला, सक्कर - 4 समोर एमाजे लायब्ररी, एलिसब्रिज अहमदाबाद 380006 गुजरात, भारत येथे आहे.

**लाभार्थी** :- महिला

**संस्थेचे कार्यक्रम व सेवा** :- MHT ने महिलांसाठी विविध कार्यक्रम ठेवतात त्यांना सक्षम बनवण्यासाठी व त्यांचे जिवनमान उंचविण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे व एक आनंद व सर्व महिलांना जोडुन ठेवण्यासाठी व त्यांचे हक्क व निवासव्यवस्था सुरक्षित ठेवण्यासाठी विविध सेवा पुरवल्या जातात.

1. 1583 शौचालयासाठी काम करणे
2. नळ कनेक्शन 80 दिले
3. महिलांना रोजगार दिला

**संस्थेची क्षमता** :- MHT ने संपुर्ण भारतातील तळागाळातील ज्या गरीब घरातील महिला ज्या आडाणी ज्यांना कोणत्याही गोष्टीचे ज्ञान नाही त्यांचा विकास होईल अशा महिलांना सक्षम बनवण्याचे काम या संस्थेतुन केले जाते.

**समाजकार्याची भुमिका** :- एक समाजकार्यकत्यांची भुमिका असते की जे समाजातील गरीब गरजु महिला आहेत जे समाजाच्या अन्यास सहन करतात त्यांना योग्य तो हक्क मिळवुन देणे व वंचित असलेल्या योजनांचा लाभ मिळवुन देणे हि समाजकार्यकर्त्यांची भुमिका असते.

समाजकार्यकर्त्यांचे मत :- MHT या संस्थेचा उपक्रम हा खुप छान असुन महिलांना योग्य मार्ग दाखवणे व सक्षम बनवणे व त्यांच्या उत्पंन्नात वाढ होणे व गुणवत्ता पाठवण्याच काम संस्था करते.

VISIT - 4

**संस्थेचे नाव** :- जनसाहस फाऊंन्डेशन संस्था, अमळनेर

(जिल्हा स्थलांतर कामगार स्त्रोत केंद्र)

**संस्थेची स्थापना** :- 2000 साली झाली

**संस्थेची पार्श्वभुमी** :- जनसाहस चा अर्थ आहे समाजाचा साहस हि संस्था 23 वर्ष पासुन एक समुदाय केंद्रीत संगटना आहे. जी पुर्ण भारतामध्ये 13 व राज्यात 97 जिल्हांमध्ये 14000 ग्रामिण भागात व शहरात काम करता आहे.

हि संस्था महिलांवर व लहान बालक व कामगार यांच्यावर काम करत आहे. संस्थेची स्थापना 2000 साली झाली असुन आज पुर्ण 23 वर्षापासुन हि संस्था काम करत आहे.

जळगांव, अमळनेर मध्ये आजपर्यंत 13 ते 14 प्रकल्पांवर काम करत आहे. व जे समाजातील कामगार आहेत ज्यांच्यावर समाजात अन्याय होतो त्यांना योग्य न्याय मिळवुन देणे व रोजगार निर्माण करुन देण्याच काम करत आहे.

महिलांवर होणारे अन्याय, लहान बालकांना कामगार बनवणे त्यांना त्रास देणे अशा व्यक्तींना न्याय मिळवुन देणे व त्यांच्या विषय समाजात आवाज उठवण्याच काम हि संस्था करत आहे. कामगाराना हि संस्था 24 तास सेवेत असतात.

**संस्थेचा प्रकार** :- समाजापासुन वाचवणे व त्यांच्यावर समाजापासुन होणा-या अन्यायापासुन वंचित करणे.

**कामगार सुरक्षा** :- जे ग्रामिण भागातील गरीब लोक शहरी भागात काम करण्यासाठी येतात त्यांच्यावर होणा-या अन्याय व त्रासापासुन सुरक्षा करणे.

**उद्दिष्टे** :-

1. समाजात कामगारांना होणा-या त्रास पासुन न्याय मिळवणे देणे
2. महिलांचे हक्क मिळवणे
3. समाजिक सुरक्षा
4. बेरोजगारांना योग्य रोजगार मिळवणे
5. कामगारांच्या मुलांना योजनेचा लाभ मिळवुन देणे.

**दैनंदिन** :-

1. कामगारांची नोंदणी करणे

2. योजनांचा लाभ मिळवुन देणे

3. उत्तम प्रकारचा रोजगार मिळवुन देणे

4. कामगाराला समस्या आल्यास त्यांच्या सेवेत हजर राहणे.

**सेवा पुरवणे** :- जनसाहस ने Covid-19 मध्ये जे कामगार घरापासुन दुर होते त्यांना जेवणाची सोय सुविधा नव्हती किंवा त्यांना ज्या समस्या येत होत्या त्यांना त्या समस्या येऊ नये म्हणुन जनसाहस कडुन सेवा पुरवल्या रेशन वाटप केली.

**संस्थेचे काम** :- जे समाजात कामगार काम करत आहे त्यांना मालक वेळेपेक्षा जास्त वेळ काम करुन घेणे त्यांना पगार कमी देणे त्यांना त्रास देणे अशा वेळेस जनसाहस मदत करते. व त्यांना न्याय मिळवुन देते.

**सेवेचा नंबर** :- 18002000211

**मुख्याकार्यालय** :- दिल्ली येथे आहे.

**एकुण स्टाफ** :- प्रत्येकी जिल्हात 13 लोकांची टिम आहे.

**विद्यार्थी मत** :- जनसाहस हि 2000 वर्षापासुन अगदी छान काम करत आहे. व समाजातील महिलांवर हिंसा कामगारांवर होणारा अत्याचार यांना योग्य न्याय मिळवुन देत आहे व सुंदर पध्दतीने काम चालु आहे 24 तास सेवेत आहे.

VISIT - 5

**संस्थेचे नाव** :- राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्था, अमळनेर

**संस्थेचा पत्ता** :- राजकुंज शिवपार्वती कॉलनी सुरभि कॉलनी शेजारी, अमळनेर जि. जळगांव

**संस्थेची स्थापना** :- 26/12/1996 मध्ये झाली

**संस्थेचा नोंदणी क्रमांक** :- 13881

**संस्था शासकीय / निमाशासकीय** :- सदर राष्ट्रविकास ॲग्रो एज्युकेशन संस्था निमशासकीय असुन समाजकार्य करत आहे.

**संस्थेची पार्श्वभुमी** :- या संस्थेची स्थापना 26/12/1996 मध्ये झाली असुन या संस्थेला 27 वर्ष पुर्ण झाले आहे. 27 वर्षापासुन या संस्थेचे काम अगदी व्यवस्थित चालु आहे. व महिलांवर व पशुधनावर व पाणी आडवा पाणी जिरवा, आरोग्य यावर काम करत आहे. त्यात महिलांना नवनवीन उद्योग व्यवसाय स्थापन करुन दिली. शेतक-यांना विहीर, नळकनेथ्शन आशा योजनांचा लाभ मिळवुन दिला.

**संस्थेचा उद्देश** :- या संस्थेचा उद्देश असा की समाजात असंख्य महिला ज्या स्वता:च्या कोणताही व्यवसाय करत नाही व स्वता:चे घर चालवचण्यास समस्या निर्माण होत आहे. अशा महिलांना स्वता:चा व्यवसाय सुरु करण्यात मदत करणे.

शेतक-यांच्या समस्या सोडवणे त्यांना योजनांचा लाभ मिळवुन देणे त्यांच्या आरोग्यावर येणा-या समस्या पाण्याची बचत कशी करावी म्हणजे काय समाजाचा विकास घडवुन आणावा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

**संस्थेची दैनंदिनी** :- या संस्थेची दैनंदीनी प्रत्येकी ग्रामीण भागात जाऊन त्यांच्या समस्या सोडवणे व वेळेचा पुर्ण पणे उपयोग कसा करावा सकाळी 10.00 ते 5.00 या वेळेची दैनंदीनी असते.

**लाभार्थी संख्या प्रवेश प्रक्रिया** :- संस्थेची प्रवेश प्रक्रिया ही समाजातील मागासवर्गीय व समाजात येणा-या समस्या महिला पुरुष सर्वांसाठी आहे.

**संस्थेची नोंदणी ठेवण्याची पध्दत** :- नोंदणी ठेवण्याची पध्दत हि दोन स्वरुपची आहे प्रथम पध्दत हि Online आहे. त्यात नाव नोंदणी केले जाते व दुसरी पध्दत हि Online पध्दत वापरली जाते.

**संस्थेचे काम** :- पाणी लोट या प्रोजेक्ट असला तर त्या गावात जाऊन त्यांचा आराखडा तयार करणे व DPR मध्ये कार्य करावे लागते.

या संस्थेने महिला सक्षमीकरणार काम केले आहे. त्यात पशु धनासाठी व शेतकरी जमिनीसाठी, पाणी आडवा पाणी जिरवा आणि आरोग्य या संदर्भात या संस्थेचे काम चालु आहे.

**संस्थेला येणा-या समस्या** :- संस्थेचे काम चालु असतांना अनेक समस्या ह्या उद्‌भवत असतात जस की शेतक-यांचे कर्जा विषयी, समाजाचा प्रतिसाद नसणे. आरोग्याविषयक अशा छोट्या समस्या उद्‌भवत असतात.

**समाजकार्यकर्त्यांची भुमिका** :- समाज कार्यकर्त्यांने समाजात आपली भुमिका हि समाजाला पटेल अशी ठेवावी. व समाजाचा विकास घडवुन आणावा त्यांच्या समस्या सोडवाव्या अशा प्रकारे समाजकार्यकर्त्यांची भुमिका असावी.

VISIT - 6

**संस्थेचे नाव** :- आधार बहुउद्देशीय संस्था, अमळनेर

**संस्थेचा पत्ता** :- न्यु प्लॉट कचेरी जवळ, स्टेशन रोड, अमळनेर

**संस्थेचा पत्ता** :- FG089 / Jalgoan

**संस्था शासकीय निमशासकीय** :- आधार बहुउद्देशीय संस्था हि CSR Funding & Govt. Funding वर चालत आहे.

**संस्थेची पार्श्वभुमी** :- या संस्थेची स्थापना दि. 22/05/1998 साली झाली असुन संस्था स्थापन करण्यासाठी 10 ते 15 लोकांची संख्या असुन स्थापन करण्यासाठी 7 लोकांची कमिटी होती.

**अध्यक्ष** :- सौ. भारती पाटील

**कार्यकारी संचालक** :- सौ. रेनु प्रसाद

हि संस्था महिला व मुलांवर काम करते. या संस्थेने अमळनेर मध्ये 450 बचतगट तयार केले. अशा प्रकारे या संस्थेची पार्श्वभुमी आहे.

**संस्थेचा प्रकार** :-

1. Family Counseling Center
2. Viban Care Center
3. Adhar Arogya Center
4. Swami Project
5. Women Help
6. Women Development

**संस्थेचा उद्देश** :-

1. महिला स्ववलंबी बनावे
2. अनाथ मुलांना मदत करणे
3. शालेय योजनांचा लाभ मिळवुन देणे
4. आरोग्य विषय सुविधा उपलब्ध करुन देणे
5. HIV च्या मुलांना मदत करणे
6. महिलांना मार्गदर्शन करणे
7. समाजातील आर्थिक दुर्बल घटकांच्या समस्या सोडवणे

8. मुलांचा विकास होण्यासाठी त्यांना मदत करणे

**संस्थेचे काम** :- 2003 पासुन संस्थेने अमळनेर, चोपडा, पारोळा आणि धरणगांव ब्लॉकमधील विविध प्रकारच्या 600 महिला सेक्स, वर्कर्ससाठी वेश्याव्यवसाय, हस्तक्षेप प्रकल्प राबविला आहे. कंडोम प्रमोशन HIV प्रतिबंध आणि काळजी समर्थन NGO मार्गदर्शनानुसार STI व्यवस्थापन यासारख्या घटकांवर थेट कार्य समुदाय एकत्रकरण, वकीली आणि नेटवर्कींग आणि समुदाय सक्षमीकरण, प्रकल्पात काम करणारे 60% कर्मचारी समुदायातील आहेत.

**FSW चा लक्ष्यित हस्तक्षेप प्रकल्प** :- कोविड 19 महामारी आणि लॉकडाऊन काळात आम्ही नॅशनल नेटवर्क ऑफ सेक्स वर्कर्स आणि व्यक्तिच्या सहकार्यांने सतत 4 महिने कोरड्या रेशनचे वितरण सुरु ठेवले.

**संस्थेच्या सेवा** :-

1. HIV मुलांना औषधे वाटप करणे.
2. PALAHIV ग्राहकांना सेवा पुरवणे
3. विहान CACC Medicen
4. L.F.U. चे समुपदेशन
5. आरोग्य तपासणी
6. Special Camp
7. 128 अनाथ पालकांना पोषण आणार दिला.

**संस्थेची नोंदणी पध्दत** :- सर्वप्रथम नाव नोंदणी केले जाते त्यानंतर प्रवेश पावती केस पेपर Online book नाव केले जाते अशा प्रकारे नोंदणी केली जाते.

**माता आणि बाल आरोग्य सेवा** :- 9 झोपडपट्टी भागातील प्राथमिक आरोग्य सेवा प्रकल्प राबवण्यात प्रदान करते. कोविड -19 महामारीमध्ये अंदाजे 2 वर्ष आम्ही कोविड सर्वेक्षण कोविड लयीकरण नियमित मात आणि मुलांसाठी लसीकरण कार्यक्रम घेतो.

**संस्थेचा आर्थिक स्त्रोत** :- या संस्थेचा आर्थिक स्त्रोत हा CSR च्या माध्यमातुन मिळतो व सरकारच्या माध्यमातुन व इतर निधी मधुन मिळत असतो.

**संस्थेची क्षमता** :- जवळपास हि संस्था 8 ते 9 प्रकल्पांवर काम करत असुन असंख्य गावात तालुक्यात जिल्हात काम सुरु आहे. जस की जळगांव, धुळे, अमळनेर व चोपडा अशा अनेक भागात काम सुरु आहे.

**समाजकार्यकर्त्यांची भुमिका** :- या संस्थेच्या माध्यमातुन गरीब गरजुंना त्यांच्या लाभ मिळवुन देणे महिलांचा विकास घडवणे समस्यांचे निराकरण करणे हि समाजकार्य कत्यर्झांची भुमिका आहे.

**समाजकार्यकर्त्यांची मत** :- माझ्या मतानुसार मला वाटत की या संस्थेने प्रत्येक ग्रामिण भागाकडे पण लक्ष्य द्यावे कारण तिकडे अशा प्रकारच्या जास्त समस्या आढळुन येतात.

VISIT - 7

**संस्थेचे नाव** :- ग्रामिण रुग्णालय, अमळनेर

**संस्थेचा पत्ता** :- ग्रामिण रुगणालय, LIC ऑफीस शेजारी, अमळनेर जि. जळगांव

**संस्थेची स्थापना** :- 01/10/1999 ला कार्यरत झाली व स्थापना 3/07/1999 अमळनेर शहरात झाली

**संस्थेची पार्श्वभुमी** :- या रुग्णालयाची 3/07/1999 ला स्थापना केली व 1/10/1999 ला कार्यरत सुरु झाली 2005 पासुन ICTC विभागाच सथापना झाली. या रुग्णालयामार्फत सर्व प्रकारच्या गरीब गरजु लोकांना सेवा पुरवल्या जातात. अशा प्रकारे या संस्थेची पार्श्वभुमी आहे.

**संस्थेचा उद्देश** :-

1. रुग्णापर्यंत आरोग्य सेवा उपलब्ध करणे.
2. मेडीकल उपलब्ध करुन देणे
3. सुप्रेडेन्स ग्रेन इन्जेक्शन सेवा देणे
4. 40 खाटांची व्यवस्था आहे.
5. गरीब लोकांना मोफत सेवा देणे.
6. फ्री आरोग्य सेवेचा कार्यक्रम ठेवणे

**संस्थेची प्रशासकीय व्यवस्था** :- या रुग्णालयाचे कामकाज खुप मोठे आहे. प्रत्येक जिल्हात, तालुक्यात ग्रामिण भागातील व्यक्तींवर काम करत आहे. सर्व प्रकारच्या प्रशासकीय व्यवस्था आहेत.

**संस्थेची दैनंदीनी** :- या संस्थेची दैनंदीनी ही सकाळी 9.00 ते 5.00 या दरम्यान असते. या दैनंदीन वेळेत सर्व सेवा पुरवल्या जातात.

**संस्थेची प्रवेश प्रक्रीया** :- सर्वप्रथम नाव नोंदणी केले जाते. व केस पेपर काढावा लागतो अशा प्रकारे प्रवेश प्रक्रिया आहे.

**संस्थेच्या योजना / सेवा** :-

1. संजय गांधी निराधार योजना
2. लस मोफत सेवा पुरविणे
3. बाल संगोपन योजना
4. मेडीकल मोफत सेवा
5. शासनाच्या विविध योजना शासनाकडुन मिळत असतात.

**संस्थेची आर्थि स्त्रोत** :- या रुग्णालयाचा आर्थिक स्त्रोत निधी वर चालत असतो. शासनाच्या निधीवर सर्व सेवा पुरविल्या जातात.

**समाजकार्यकर्त्यांची भुमिका** :- समाजकार्यकर्त्यांने समाजातील जे गरीब गरजु व्यक्ती अशा व्यक्तींना या रुग्णालयाचा लाभ घेण्यास सांगावे. त्यांना कोणत्या योजनेने आपला स्व:खर्च व रुग्णालयाचा खर्च मिळेल त्या योजनांची माहिती द्यावी.

**समालजकार्यांचे मत** :- मला वाटते की या रुग्णालयात खुप छान सेवा पुरविल्या जातात व सर्व उपचाराचे निदान या रुग्णालयात केले जाते व गरीब गरजु व्यक्तींना मदत केली जाते.

VISIT - 8

**संस्थेचे नाव** :- लिलाई बालगृह, जळगांव

**संस्थेचे पर्यवेक्षक** :- श्री. विठ्ठल पाटील

**संस्थेचे उदिष्ट्ये** :- समाजातील अनाथ व निराधार मुलांचे संगोपन करणे.

**संस्थेची स्थापना** :- इ.स.1997 शासन मान्यता इ.स. 2010

**संस्थेची माहिती** :- लिलाई बालगृह हे महिला व बाल विकास विभाग, जळगांव महाराष्ट्र शासन अंतर्गत चालते बालन्याय अधिनियम 2015 नुसार मुलांना 2000 रु. अनुदान मिळते त्यात 1500 रु. मुलांसाठी दिले जाते. सुरुवातीला बालगृहात 25 मुलांच्या प्रवेशाची मान्यता होती आता त्यात वाढीव करुन 22 मुलांची मान्याता दिली असे एकुण 50 मुले या बालगृहात प्रवेशित आहेत. बालगृहात मुलांचे साधारण वय वर्ष 6 ते 18 वयोमर्यादा आहे दर 3 महिन्याला मा. जिल्हाधिकारी व महिला बालविकास अधिकारी बालगृहाला भेट देतात. मुलांना सकस पोषण आहार दिला जातो.

**बालगृहात राबविले जाणारे उपक्रम** :- आपले सर्व सण-उत्सव बालगृहात मोठ्या उत्साहाने साजरे केले जाते. तसे गणेशोत्सव, दिवाळी, 15 ऑगस्ट, 26 जानेवारी इ.

वर्षाला 1 शैक्षणिक सहल काढण्यात येते, मुलांना दररोज या ाळेत पाठविले जाते दर रविवारी मुलांना Extra Class दिला जातो. त्यासाठी 6 शिक्षक रविवारी मुलांच्या विषयानुसार Class घेतात इ. 9 ते 10 वी. च्या मुलांना MSCTI चे प्रशिक्षण दिले जाते. बालगृहात प्रवेशित प्रत्येक मुलांचा वाढदिवस साजरा केला जातो.

**समाजकार्यकर्त्यांचह भुमिका** :- समाजातील अनाथ निराधार बेवारस मुलांचे पुर्नवसन करण्यासाठी अशा बालगृहाची निर्मिती करण्यात आली आहे. अशी माहिती गरजुंपर्यंत जन-जागृतीच्या माध्यमातुन समाजकार्यकर्ता पोहचवु शकतो व अशी मुले आढळल्यास प्रशासनास माहिती देवु शकतो.

**निरीक्षण** :- बालगहातील हि मुले अतिशय आनंदी व सुरक्षित जिवन जगत आहे. सर्व मुले अतिशय शिस्तबध्द पध्दतीने राहतात.

VISIT - 9

**संस्थेचे नाव** :- चेतना व्यसनमुक्ती केंद्र, जळगांव

**संस्था पर्यवेक्षक** :- नितीन विसपुते / चेतना विसपुते

**संस्थेचे उद्देश** :- समाजातील जास्तीत जास्त लोकांना व्यसनमुक्त करणे व समाज सृदृढ करणे.

**संस्थचे उपक्रम** :- संस्थेत रुग्णांच्या मनोरंजनासाठी T.V. आहे. तसेच कॅरम, चेस यासारख्या वस्तु आहेत.

**संस्थेत वापरली जाणारी पध्दत** :- CASE WORK & GROUP WORK

**संस्थेचे योगदान** :- व्यसनमुक्ती केंद्र रुग्णांला कोणत्या प्रकारचे व्यान आहे हे ओळखुन त्यांच्यावर वेगवेगळया उपचार पध्दतीवर वापर केला जातो.

**संस्थेचे कार्यक्षेत्र** :- कार्यक्षेत्र मर्यादीत आहे.

**संस्थेत प्रवेश झाल्यानंतर रुग्णांनी आणावयाच्या वस्तु** :-

1. आधारकार्ड झेरॉक्स
2. पासपोर्ट फोटो दोन
3. शर्ट, पॅन्ट 2 जोडी
4. नाईट पॅन्ट, टी शर्ट, 1 जोडी
5. आतील कपडे
6. चिवडा आणि बिस्कीटे
7. खोबरेल तेल
8. चादर
9. साबन
10. वाचनीय पुस्तके

**चेतना व्यसनमुक्ती केंद्रातील दिनचर्या** :-

सकाळी 6.00 वा. - जागर

सकाळी 6.00 ते 7.00 - स्वच्छता, अंघोळ

7.00 ते 7.30 वा. - चहा

7.30 ते 9.00 वा. - प्राणायाम, प्रार्थना, ध्यान

9.00 ते 9.30 वा. - नास्ता

9.30 ते 11.00 वा. - मेडीकल चेकअप

11.00 ते 12.00 वा. पुस्तक वाचन

दुपारी 12.00 ते 12.30 वा. - निवांत

12.30 ते 1.00 वा. - जेवण

1.00 ते 3.30 वा. - विश्रांती

3.30 ते 4.00 वा. - चहा

4.00 ते 5.00 वा. - मनोरंजन

संध्याकाळी 5.00 ते 6.00 वा - माईटु फ्रेशनर ॲाक्टीव्हिटीज

6.00 ते 7.30 वा. - समुपदेशन, स्किल डेव्हलमेंन्ट, प्रेरक चित्रपट, प्रेरणादायक व्यक्तींची भेट

7.30 ते 8.00 वा. - ध्यान, मेडीटेशन

रात्री 8.00 ते 9.00 वा. - रात्रीचे जेवन

9.00 ते 10.00 वा. - मनोरंजन टेलिव्हीजन कार्यक्रम

10.00 वा. - रात्रीची झोप

**संस्थेत उपलब्ध सुविधा** :-

1. तज्ञ मानोसउपचार डॉक्टर्स
2. तज्ञ किणीशियन
3. तज्ञ समुपदेशन
4. अनुभवी व प्रशिक्षीत मेडीकल स्टाफ
5. ताण-तणाव व्यवस्थापनाचे प्रशिक्षण
6. व्यक्तीगत विकासाचे धडे
7. सुरक्षित, सुसज्ज प्रशस्त इमारत
8. प्रभावी औषधोपचार
9. निसर्गरम्य वातावरण
10. 24 तास ॲडमिशन
11. मद्यपी रुग्णानियंत्रण धरुन व्यसनमुक्ती केंद्रात आणण्यासाठी पिकअप व्यवस्था
12. रेसिडेंन्स
13. जिम, योगा, वैयक्तिक समुपदेशन
14. लायब्ररी

15. म्युझिक थेरीपी

16. हिप्तोथेरेपी

**समाजकर्यकर्त्याची भुमिका** :- समाजकार्यकर्त्यांनी समाजात व्यसनमुक्ती बाबत जन-जागृती करणे व त्यांना व्यसनी व्यक्ती आढळल्यास संबंधित व्यसनमुक्ती केंद्रासबंधी माहिती पुर्णपणे देणे.

**निरीक्षण** :- चेतना व्यसनमुक्ती केंद्रामध्ये प्रेशन्ट्सला योग्य पध्दतीने वागणुक दिली जाते. पेशन्ट्सला उपचारासाठी समुपदेशन व मनोपचार डॉक्टरांची उपलब्धता असते. त्यांच्यावर योग्य ती उपचार पध्दती वापरली जाते. रुग्णांची दिनचर्या अतिशय व्यवस्थित आहे. रुग्णांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

VISIT - 10

**संस्थेचे नाव** :- आश्रम माझे घर, जळगांव

**संस्थेचे पर्यवेक्षक** :- रेखा पाटील

**संस्थेचे उद्देश** :- समाजातील मतिमंद मुलांचे पालन-पोषण करणे.

**संस्थेचे उपक्रम** :- संस्थेत पेशन्टच्या मनोरंजनासाठी खेळ खेळले जातात, त्यांच्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेतले जातात आणि त्यांना चित्र काढणे वस्तु बनविणे असे उपक्रम राबविले जातात.

**संस्थेचे कार्यक्षेत्र** :- या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादीत आहेत.

**कार्यशाळा** :-

1. कॅरम
2. अगरबत्ती
3. पणत्या
4. कार्डशिट

**विद्यार्थी संख्या** :- 30 ते 30

**प्रवेश प्रक्रिया** :- विद्यार्थ्यांची वयोमर्यादा 18 ते 80 वर्षापर्यंत फक्त पुरुषांना प्रवेश दिला जातो, प्रवेश वेळी पॅनकार्ड, आधार कार्ड, सिव्हिल, सर्टीफीकेट, जन्म दाखला, शारिरीक तपासणी केली जाते मंग प्रवेश दिला जातो.

**आरोग्य तपासणी** :- ॲक्युप्रेशन थेरपी, सायकोलॉजिस्ट मेडीसीन, OPD, रक्त तपासणी डॉ. सोनाली पाटील (होमीओपॉथी)

**संस्थेची दैनंदीनी** :- सकाळी 6.00 वा. व्यायाम केला जातो त्यानंतर नासता व वर्कशॉप केले जाते आणि पुर्ण दिवस मुलांना कामात व्यस्त ठेवावे लागते कारण व्यस्त नाही ठेवले तर त्यांची मेमरी लॉस होत जाते.

**संस्थेची फी** :- मुलांना दरमहिण्याचा खर्च हा 5 ते 6 हजार होत असतो. व त्यामुळे पालकांकडुन वर्षाला 25 ते 30 हजार रुपये फी घेतली जाते.

**एकुण कर्मचारी** :- सर्व कर्मचारी 11 आहेत व सर्व वेगवेगळया पोस्टवर आहेत.

**समाजकार्यकर्त्यांची भुमिका :-** समाजकार्यकत्यांनी समाजात असलेल्या मतिमंद मुलांबाबत समाजात जन-जागृती केली पाहिजे हे मुल आपल्यापैंकी एक आहे आणि त्यांच्यासोबत आपण चांगली वागणुक दाखविली पाहिजे आणि त्याचा स्वीकार केला पाहिजे.

**निरीक्षण :-** केशव स्मृती प्रतिष्ठान अंतर्गत असलेल्या आश्रय माझे घर हा प्रकल्प मतिमंद मुलांसाठी मोलाचे कार्य करत आहे.

या प्रकल्पामध्ये मतिमंद मुलांच्या जीवनासाठी कार्य करीत आहे. मुलांना रंग ओळखणे ABCD लावणेख ग्रीप बसविने, बोलणे व स्व:ताचे दैनंदीन काम स्वत: करणे या सगळयाचे प्रशिक्षण संस्थेत दिले जाते.

VISIT - 11

**संस्थेचे नाव** :- केशवस्मृती प्रतिष्ठान मातोश्री वृध्दाश्रम (आनंदाश्रम), जळगांव

**संस्था पर्यवेक्षक** :- हेमंत कुलकर्णी

**संस्थेचे उद्देश** :- समाजातील निराधार वृध्दांना आधार देणे व त्यांना आपल्या घराप्रमाणे वागणुक देणे.

**अनुदान** :- समाजातील प्रतिष्ठीत लोकांकडुन डोनेशनच्या माध्यमातुन अनुदान स्वीकारत (फंडीग) स्वरुपात देणगी

**संस्थेचे उपक्रम** :- संस्थेत वृदांच्या मनोरंजनासाठी वेगवेगळे संस्कृतीक कार्यक्रम घेण्यात येत व त्यात सर्व वृदांचा सहभाग असतो. आणि भजन किर्तन तसेच वेगवेगळे सण-उत्सव घेतले जातत आणि खेळीचे वातावरण निर्माण केले जाते.

**संस्थेत वापरली जाणारी पध्दत** :-

1. व्यक्ती सहयोग कार्य
2. गटकार्य

**संस्थेचे योगदान** :- मातोश्री वृदाश्रम हि संस्था निराधार वृदांना कुटुंबासारखे वातावरण देते त्यांना कुटुंबाची आठवण न येणे अशा सर्व सोईसोविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

**संस्थेचे कार्यक्षेत्र** :- विविध क्षेत्रात कार्य करते

**संघटनात्मक संरचना** :- या संस्थेची संरचना हि मॅनेजर व इतर सदस्य असतात त्याप्रमाणे मदतनीस असतात.

**प्रवेश प्रक्रिया** :- या संस्थेत येणारे वृद समाजकार्यकर्त्यांचा माध्यमातुन किंवा स्वत: प्रवेशित होतात ओळखपत्र, रेशनकार्ड, फोटो यांच्या आधारावर प्रवेशित होतात.

**संस्थेद्वारे पुरविल्या जाणा-या सुविधा** :- या संस्थेमधुन अनेक वृदांना आधार मिळालेला आहे. आयुष्यातील उतार वयात या संस्थेचा भरपुर लोकांना फायदा झाला आहे.

**समाजकार्यकर्त्याची भुमिका** :- समाज कार्यकर्त्याने जे समाजातील निराधार वृद आहे. त्यांना अशा वृदांआश्रमाची माहिती द्यावी. मात्र अशा वृदांश्रमाची संख्या जास्त होण्यासाठी जन-जागृती करायला हवी.

**लाभार्थ्यांना झालेला फायदा** :- या संस्थेच्या माध्यमातुन अनेक वृध्दांना आधार मिळालेला आहे. आयुष्यातील उतार वयात हे चांगल्या पध्दतीने त्यांना जगता येत. या संस्थेचा भरपुर लोकांना फायदा झाला.

**अतिरीक्त माहिती** :- या वृदाश्रमात वयाच्या 55 व्या स्त्रिया व वयाच्या 60 पासुन प्रवेशित होऊ शकतात महिण्याला 3000/- फी त्यांच्याकडुन आकारली जाते. नास्ता वृदाश्रमातच बनतो केशव स्मृती प्रतिष्ठानाच्या अनेक समाजिक संस्था आहेत. राज्यात एकुण 25 वृदांश्रम आहेत. त्यांच्या गरजेच्या व मनोरंजनाच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

**निरीक्षण** :- या वृध्दाश्रमात वृदांची उत्तम अशी सोय ठेवण्यात आली आहे. ते कशा प्रकारे आनंदी व प्रसन्न राहतील याची काळजी घेतली जाते. वृदाश्रम हे निसर्गाच्या सानिध्यात आहे.

VISIT - 12

**संस्थेचे नाव** :- बालगृह व निरीक्षण गृह, जळगांव

**मार्गदर्शक** :- जयश्री पाटील

**संस्थेची स्थापना** :- मुले - 1954 मध्ये आणि मुली 1995 मध्ये

**संस्थेचे उद्दिष्टे** :- चुकून गुन्हा करुन दाखल झालेल्या मुलांना योग्य मार्ग दाखवणे व समाजात आणणे व अनाथ मुलांना स्वत:च्या पायावर उभे करणे.

**अनुदान** :- महिला बालविकासाकडुन मिळतो

**संस्थेचे प्रकार** :- संस्था ही निमशासकीय आहे. संस्थेमध्ये दोन प्रकार आहेत

1. बालगृह
2. निरीक्षणगृह

**वयाची अट** :- निरीक्षण गृह 12 ते 18 आणि बालगृह 6 ते 18

**उपक्रम** :- स्वता:च्या व्यवसाय सुरु करण्यासाठी मुलींना पार्लर, फॅशन डीझाईन असे काही उपक्रमात त्यांना स्वत:च्या व्यवसाय सुरु करता येतो. मुलांसाठी पण असे काही उपक्रम राबविले जातात. व तसेच सर्व प्रकारचे सण-उत्सव व वाढदिवस साजरे केले जातात.

**कर्मचारी वर्ग** :- एकुण 13 कर्मचारी नियुक्त आहेत.

**निरीक्षण** :- मुलांना चांगल्या प्रकारचे ठेवले जाते व तेही त्यांच्या रुमची साफसफाई करुन त्यांच्या वस्तु त्या ठिकाणी आहेत ज्यात एक बाजुला निरीक्षणगृह व बालगृह सर्वांना एक सारखे त्यांना वळण शिक्षण दिले जाते व त्यांना चांगल्या मार्ग दाखवला जातो.

**समाजकार्यकर्त्यांची भुमिका** :- समाजातील अनाथ / बेवारस व गुन्हांच्या मार्गाला जाणा-या मुलांचे पुर्नवसन करण्यासाठी व त्यांना गुन्हा करण्यास थांबविण्यासाठी अशा बालगृहातील समाजकार्यकर्त्यांनी जन-जागृती करुन त्यांना समाजात जगण्यासाठी व चांगले जिवन जगण्यासाठी मार्ग दाखविणे.